॥ समतेचें हें तुफान उठलें ॥

विंदा करंदीकर

ऊठ ऊठ सह्याद्रे, घुमवित, बोल मराठी खडे
समतेचें हें तुफान उठलें, उठले सागरकडे ॥ धृ. ॥

हीच मराठी जिच्या मुखानें वदली ज्ञानेश्वरी
शिवबानें तरवार घासली याच मराठीवरी
हिच्या स्वागतासाठीं झडले तोफांचे चौघडे ॥ १ ॥

टिळक, गोखले, फुले, रानडे, आगरकर-वैखरी
स्वातंत्र्याच्या पांच मशाली जळती वेदीवरी
ह्या ज्योतीवर दीप पेटवा, चला भविष्याकडे ॥ २ ॥

स्वतंत्रतेचा मंत्र जयांना गर्भामध्यें मिळे
तेच मराठे आम्ही, आम्ही सह्याद्रीचे सुळे
स्वराज्यांतुनी पुढें चला रे, चला सुराज्याकडे ॥ ३ ॥

दर्याच्या भरतीच्या लाटा महाराष्ट्र अंगना
कंकणनादा भिउनि तयांच्या शत्रु सोडिती रणा
वीज माळुनी वेणीवरतीं त्याही घुसल्या पुढें ॥ ४ ॥

ऊठ खेडुता, पुन्हां एकदा, झाडुनियां घोंगडी
ऊठ मजूरा, पुन्हां मारण्या आघाडीवर उडी
एकजूट ही पाहुन पडतिल अन्यायाला तडे ॥ ५ ॥

ही कविता जरा अपुरी किंवा जरा जुनी असल्याचे सद्य
परिस्थितीवरून वाटते.

soc.culture.indian.marathi (SCIM) newsgroup postings